ePaper
# पिंपरी-चिंचवडमधील अनधिकृत बांधकामे नियमित:देवेंद्र फडणवीस

| वर्ष - 6 । अंक - 248 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, 22 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



### आतील पानांत

- पाण्यासाठी महिला रस्त्यावर
- कानडी सरकारच्या निषेधासाठी महाराष्ट्र एकीकरण समितीचं'चलो कोल्हापूर'
- "कर्नाटकातील एक इंचही जागा महाराष्ट्राला देऊ नका"


## शिंदे-फडणवीस सरकारचे शहरवासीयांना "विंटर गिफ्ट"

# पिंपरी-चिंचवडकरांची शास्तीकरातून अखेर मुक्ती!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

गेल्या १४ वर्षापासून पिंपरी-चिंचवडकरांवर लादलेले शास्तीकराचे ओझे अखेर कमी झाले असून, राज्य सरकारने शास्तीकर माफ करण्याची ऐतिहासिक घोषणा नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात केली आहे. पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष आणि आमदार महेश लांडगे यांनी आज लक्षवेधी लावली. त्यावर चर्चा करताना पिंपरी-चिंचवडकरांची बाजू सक्षमपणे सभागृहात मांडली. अखेर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक



भूमिका घेत पिंपरी-चिंचवडसाठी शास्तीकर माफ करण्याची घोषणा करण्यात आली.

महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २६७ 'अ' नुसार दि. ४ जानेवारी २००८ रोजीचे व त्यानंतरचे अवैध बांधकामांना देय मालमत्ताकराच्या दुपटीइतकी अवैध बांधकामांना शास्ती लावण्यात आली होती. तथापि, शासन निर्णय दि. ८ मार्च २०१९ नुसार निवासी मालमत्तांना १ हजार चौरस फुटापर्यंत शास्ती माफ करण्यात आली. १ हजार ते २ हजार चौरस फुटापर्यंत निवासी बांधकामांना प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या ५० टक्के दराने शास्ती आकारण्यात येत होती. तसेच, २ हजार चौरस फुटांपुढील निवासी बांधकामांना प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात येत आहे. उर्वरित बिगरनिवासी, मिश्र, औद्योगिक मालमत्तांना दुप्पट दराने शास्ती लावली जात होती. त्यामुळे शास्तीकर अन्यायकारकपणे आकारण्याला सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी विरोध केला होता. दरम्यान, या ऐतिहासिक निर्णयामुळे अनधिकृत बांधकाम नियमितीकरणाच्या लढ्याला बळ मिळाले असून, शिंदे-फडणवीस सरकारकडून पिंपरी-चिंचवडकरांच्या मागण्यांची पूर्तता होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### शहरातील 96 हजार 777 मिळकतींना दिलासा...

**पिंपरी-चिंचवड शहरात एकूण ९६ हजार ७७७ बांधकामांना शास्तीकर माफीचा दिलासा मिळणार आहे. यामध्ये राहणारे सुमारे ४ लाख ५० हजार नागरिक आणि व्यापारी, व्यावसायिक यांच्यासह लघु उद्योजकांना शास्तीकरातून सुटका झाली असून, राज्य सरकारच्या निर्णयाचे स्वागत होत आहे. सध्यपरिस्थितीत अवैध बांधकामांचा शास्तीकर ४६७.६५ कोटी रुपये आहे. चालू वर्षाचा कर ३४६.८१ कोटी रुपये अशी एकूण ८१४ कोटी रुपयांची थकबाकी आहे. यापैकी सुमारे ४५० कोटी रुपये मूळ कर वसुलीचा मार्ग मोकळा झाला असून, प्रतिवर्षी सुमारे १२० कोटी रुपये मिळकतकर वसुली सुलभ होणार आहे.**

" गेल्या अडीच वर्षापासून पिंपरी-चिंचवडमधील शास्तीकर माफीबाबत लक्षवेधी लागेल याची प्रतीक्षा होती. अखेर विधिमंडळात या मुद्यावर चर्चा झाली. राज्य सरकारने पिंपरी-चिंचवडकरांची भूमिका समजून घेतली. आज झालेल्या लक्षवेधीमध्ये मला माझ्या शहरवासीयांची बाजू मांडता आली आणि त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शास्तीकरातून आमची मुक्तता करीत आहोत, अशी घोषणा केली. याबद्दल पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने राज्य सरकारचे आभार व्यक्त करतो.

– **महेश लांडगे,** शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# बोगस व बिगर व्यावसायिक फेरीवाला सर्वेक्षण रद्द करा

## पिंपरीत फेरीवाला समितीच्या बैठकीत सदस्यांची मागणी

।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शहर फेरीवाला समितीची बैठक स्थायी समिती सभागृहात झाली. यावेळी नगरपरिषदेच्या सदस्याने चुकीच्या पद्धतीने केलेल्या सर्वेक्षणाबाबत आक्षेप घेतला. बोगस व बिगर व्यावसायिक तज्ज्ञांची नावे रद्द करण्याची मागणी सर्वांनी सभागृहात मांडली. यावेळी अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ, शितल वाकडे, प्रशांत जोशी, सीताराम बहुरे, अण्णा बोदडे, केशवकुमार थोरात, राजेश आगले, सुचिता पानसरे, महाराष्ट्र फेरीवाला क्रांती महासंघाचे अध्यक्ष काशिनाथ नखाते, राजेंद्र वाकचौरे, कविता खराडे, संतोष जाधव, प्रल्हाद कांबळे, डॉ. बी.जी. कांबळे, रमेश शिंदे, फरीद शेख, डॉ. सरोज अंबिके, बी.के. कांबळे व इतर अतिरिक्त सदस्य उपस्थित होते.**



फेरीवाला सर्वेक्षणाची जबाबदारी ज्या एजन्सीला दिली आहे, त्यावर प्रशासन आणि सर्व अधिकाऱ्यांचे नियंत्रण नाही. अधिकारी व कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन हे सर्वेक्षण पूर्ण करणे, पावतीवर त्यांचा शिक्का व होकार देणे महत्त्वाचे होते. बोगस टपऱ्या व हातगाड्यांवर बेकायदेशीरपणे थांबून छायाचित्रे काढून सर्वेक्षण केले जात आहे.

### महापालिका आरोग्य विभागाकडे तक्रार

परिणामी, संख्या वाढवण्यासाठी अधिक बोगस व्यक्तींची भरती केली जाते तर लाभार्थी बाजूला ठेवले जातात. काशिनाथ नखाते यांच्यासह सदस्यांनी हे बोगस सर्वेक्षण रद्द करून त्याचे कायदेशीर लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांना वाटप करण्याची मागणी केली. याव्यतिरिक्त, फील्ड ऑफिसरच्या स्वाक्षरीसह वितरण पावती प्रदान केली जावी.

ठेकेदाराकडे पावती असल्याने आर्थिक पिळवणूक होत आहे. जितेंद्र वाघ म्हणाले की, अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण केलेल्या लोकांची पडताळणी करावी आणि ज्यांच्या आक्षेप असतील त्या रद्द करण्याबाबत प्रशासन भूमिका मांडण्याचा निर्णय घेईल.

# पाण्यासाठी महिला रस्त्यावर!

## फुरसुंगीमधील पाणीसमस्या तीव्र, 'रास्ता रोको'दरम्यान मोठी वाहतूक कोंडी

हडपसर
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

फुरसुंगी परिसरातील पिण्याच्या पाण्याची समस्या तीव्र झाली असून, महापालिकेडून अनेक ठिकाणी दूषित पाणी येत असल्याने संतप्त महिलांनी सोमवारी सकाळी हडपसर-सासवड मार्गावर भेकराईनगर चौकात रास्ता रोको आंदोलन केले. एक तास रस्ता अडवून धरल्याने दोन्ही बाजूला दहा किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. आंदोलनामध्ये अनेक ज्येष्ठ नागरिक महिलाही सहभागी झाल्या होत्या. अचानक झालेल्या आंदोलनामुळे वाहतूक पोलिस आणि पालिका कर्मचाऱ्यांचा तारांबळ उडाली. दोन दिवसांत स्थानिक नागरिक, महाराष्ट्र जल प्राधिकरण व महापालिकेचे अधिकारी यांची बैठक घेऊन समस्या सोडविण्यात येईल, असे आश्वासन मिळाल्यानंतर नागरिकांनी आंदोलन मागे घेतले.

सासवड रस्त्यावरील भेकराईनगर पोलिस चौकीसमोर आंदोलन झाले. परिसरातील महिलांसह भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्यांनीही आंदोलन सहभाग घेतला. आंदोलन झाल्याची माहिती मिळताच घटनास्थळी दाखल झालेल्या पालिकेच्या अधिकाऱ्यांनी महिलांना सुरुवातीला ढोबळ आश्वासन दिले. यामुळे महिला अधिक आक्रमक झाल्या. 'महापालिकेचा निषेध असो...' अशा जोरदार घोषणा देऊन अधिकाऱ्यांना धारेवर धरण्यात आले.

आंदोलक आक्रमक होत असल्याचे दिसताच अधिकारी घटनास्थळावरून निघून गेले. तोपर्यंत वाहनांच्या रांगा वाढतच असल्याने हडपसर पोलिसांनी 'पालिकेच्या अधिकाऱ्यांनी ठोस उत्तर द्यावे,' अशी विनंती केली.



### कालवा स्वच्छ करण्याचे काम सुरू

स्वतःचा पाण्याचा धंदा बंद पडेल यासाठी टँकर माफिया येथील पाणी योजनेमध्ये अडचणी आणत आहेत का, असा प्रश्न यानिमित्ताने विचारला जात होता.पाटबंधारे विभागाच्या कालव्यामधील पाणी फुरसुंगी, तुकाईटेकडीवरील जलशुद्धीकरण प्रकल्पाला सोडले जाते. मात्र, या कालव्यामध्ये जनावरांचे मृतदेह सापडल्याने पाणीपुरवठा थांबवला होता. त्यामुळे पाणीपुरवठा विस्कळित झाला आहे. हडपसर क्षेत्रीय कार्यालयाकडून जनावरांचे मृतदेह बाहेर काढण्याचे व कालवा स्वच्छ करण्याचे काम सुरू आहे.

# हिर्डोशी धरणग्रस्त अंदोलकांचे तोंडाला काळे फासुन निषेध!

। नसरापूर ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

- मागील पाच दिवसापासुन प्रशासनाच्या विरोधात हिर्डोशी ता. भोर येथे अंदोलन करणारया निरा देवघर धरणग्रस्तांची प्रशासनाने दखन न घेतल्याने तोंडाला काळे फासुन प्रशासनाचा निषेध केला आहे व धरणे आंदोलन सुरुच ठेवुन दखल न घेतल्यास धरणात जलसमाधी घेण्याचा इशारा या धरणग्रस्तांनी दिला आहे

भोर तालुक्यातील नीरा देवघर धरण क्षेत्रातील हिर्डोशी येथील धरणग्रस्तांचा पुनर्वसन प्रश्न गेल्या 17 वर्षांपासून प्रलंबीत राहिला आहे. यासाठी कायदेशीर संघर्ष केल्यानंतरही या हिर्डोशी ग्रामस्थाच्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत.त्यामुळे त्यांचा संयम संपला असल्याने हिर्डोशी ग्रामस्थांनी हिर्डोशी येथे ता.17 डिसेंबर पासुन धरणे आंदोलन सुरु केले आहे.मात्र या अंदोलनाची शासनाने अद्याप दखल न घेतल्यानेधरणग्रस्थांनी आज ता.21 रोजी तोंडाला काळे फासुन प्रशासनाचा निषेध करत आंदोलन सुरु ठेवले आहे.



2007 सालापासून प्रशासनातील वेगवेगळ्या स्तरावर तहसीलदार, प्रात, अप्परजिल्हाधिकारी, आयुक्त, मंत्रालय, मंत्री महोदय, मुख्य सचिव (पुनर्वसन) या सर्वांबरोबर वेळोवेळी झालेल्या बैठकीत प्रशासनाने आपली चूक मान्य करत या 35 खातेदारांना जमीन वाटप होणे आवश्यक असल्याबाबत तोंडी सांगितले आहे. तसेच तत्कालीन मंत्री यांनी निर्देश देऊन सुद्धा प्रशासन हा फारसा विषय गांभीर्याने घेतलेला नाही, धरणग्रस्तांचा प्रदीर्घ संघर्ष व वाताहत पाहता पुनर्वसन यंत्रणेच्या चुकीची शिक्षा गेली 17 वर्ष धरणग्रस्त भोगत आहेत. प्रशासनाच्या अनागोंदी कारभारा मुळे धरणग्रस्तांचे आयुष्य उध्वस्त झाले असून, ही बाब प्रशासना बद्दल धरणग्रस्तांमध्ये चिड निर्माण करणारी आहे.त्यामुळे हिर्डोशी धरणग्रस्तांनी पुणे विभागीय आयुक्त यांना पत्राद्वारे स्पष्ट इशारा देत आंदोलनाला सुरवात केली. या धरणे आंदोलनाची गांभीर्याने दखल न घेतल्यास सामूहिक आत्महत्या शिवाय आमच्याकडे दुसरा पर्याय उरत नसल्याचे धरणग्रस्थांनी विभागीय आयुक्तांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

प्रशासनाच्या अनागोंदी कारभारामुळे व चुकीमुळे गेली 17 वर्ष धरणग्रस्त पुनर्वसनापासून वंचित राहिल्यामुळे प्रत्येकी एकरी 15 लक्ष रुपये प्रमाणे नुकसान भरपाई अदा करण्यात यावी. तसेच सर्व खातेदारांना कायदेशीर पात्रतेप्रमाणे जमीन वाटप प्रक्रिया पूर्ण करावी तो पर्यंत धरणे आंदोलन मागे घेतले जाणार नसल्याचे आंदोलनकर्त्यांनी यावेळी सांगितले.



# पुणे-लोणावळा लोकल सेवेसह रेल्वे गाड्यांच्या फेऱ्या रद्द

। पुणे।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

लोणावळा लोहमार्गावर मळवली ते कामशेत दरम्यान काम हाती घेण्यात येणार असून गुरुवारी (२२ डिसेंबर) आणि शुक्रवारी (२३ डिसेंबर) पुणे-लोणावळा लोकल सेवेसह रेल्वे गाड्यांच्या वाहतुकीवर परिणाम होणार आहे. लोकल सेवेसह रेल्वे गाड्यांच्या फेऱ्या रद्द करण्यात येणार आहे. काही रेल्वे गाड्या उशीराने धावणार आहेत. शुक्रवारी (२३ डिसेंबर) पुणे-लोणावळा लोकल सेवेच्या काही फेऱ्या रद्द करण्यात येणार आहे.

रेल्वेकडून मळवली ते कामशेत दरम्यान विविध कामे केली जाणार आहेत. त्यामुळे गुरुवारी (२२ डिसेंबर) पुणे- भुसावळ गाडी रद्द करण्यात आली आहे तसेच शुक्रवारी (२३ डिसेंबर) पुणे- भुसावळ, मुंबई-कोल्हापूर कोयना एक्सप्रेस, पुणे-लोणावळ दरम्यान सकाळी ११ वाजून १७ मिनिटे, दुपारी तीन वाजता, दुपारी चार वाजून २५ मिनिटांनी सुटणाऱ्या लोकल सेवेच्या फेऱ्या रद्द करण्यात येणार आहे. पुणे-तळेगाव, लोणावळा-पुणे, तळेगाव-पुणे दरम्यानची लोकल सेवा रद्द करण्यात येणार आहे. शुक्रवारी (२३ डिसेंबर) दुरांतो एक्सप्रेससकाळी ११ वाजून १० मिनिटांऐवजी दुपारी चार वाजून ४५ मिनिटांनी सुटेल.

# 'शास्तीमाफी'चा जल्लोष!

## पिंपरी-चिंचवड भाजपाच्या वतीने शिंदे-फडणवीस सरकारचे मानले आभार

### ढोल-ताशा- हलगीच्या तालावर पदाधिकाऱ्यांचा ठेका

पिंपरी-चिंचवड । । महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील नियमबाह्य बांधकाम बांधकामांवर लादलेला शास्तीकर पूर्ण माफ करण्याची ऐतिहासिक घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिवाळी अधिवेशनात केली. या निर्णयाचे स्वागत करत शहर भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी जल्लोष आणि आनंदोत्सव साजरा केला. भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये शास्तीकर पूर्ण माफ करण्याबाबत लक्षवेधी मांडली होती. या लक्षवेधीला उत्तर देताना राज्य सरकारने शास्ती कर पूर्ण माफ करण्याची घोषणा केली. या निर्णयाचे पिंपरी- चिंचवडकरांकडून स्वागत करण्यात आले.**



मोरवाडी येथील भाजपाच्या मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयासमोर शास्तीकर माफीचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, चिंचवड विधानसभा प्रभारी शंकर जगताप, सरचिटणीस राजू दुर्गे, मोरेश्वर शेडगे, विजय फुगे, युवा मोर्चा शहराध्यक्ष संकेत चोंधे आणि सर्व माजी नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित होते.

माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके म्हणाले की, दि.४ जानेवारी २००८ रोजी तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारने पिंपरी-चिंचवड करांवर शास्तीकर लादला होता. गेल्या १४ वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी शास्तीकराच्या मुद्याचे केवळ राजकारण केले.

२०१९ मध्ये सत्तेत आलेल्या महाविकास आघाडी सरकारनेसुद्धा अडीच वर्षाच्या काळात शास्तीकराचा प्रश्न मार्गी लावला नाही. भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी आज तमाम पिंपरी चिंचवड करांची भावना विधिमंडळामध्ये अत्यंत प्रखरपणे मांडली. त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेत पिंपरी चिंचवड शहरातील शास्ती कर पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेतला.



### पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने राज्य सरकारचे आभार

पिंपरी-चिंचवडमधील सुमारे एक लाख मिळकतधारकांवर लादलेला शास्तीकर आणि अनधिकृत बांधकामवरील कारवाईची टांगती तलवार आता दूर झाली आहे. शिंदे फडणवीस सरकारने शहरातील नागरिकांचा सहानुभूतीपूर्वक विचार केला. तसेच गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला लघु उद्योजकांच्या तसेच औद्योगिक मिळकतीवरील शास्तीचा प्रश्नही आता सुटला आहे. त्यामुळे तमाम पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने राज्य सरकारचे आणि शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे व चिंचवडचे आमदार लक्ष्मण जगताप यांचे आभार व्यक्त करते. अशा भावना माझी महापौर उषा उर्फ माई ढोरे यांनी व्यक्त केल्या.

# गंभीर गुन्ह्यातील व्यक्तींकडे शहराचे केबल नेटवर्क सोपविण्याचा भाजपचा घाट

## राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांचा पत्रकार परिषदेमध्ये घणाघाती आरोप

### भाजपचा हजारो कोटी लुटण्याचा डाव रोखण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी...

पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

अत्यंत गंभीर गुन्ह्यात आरोपी असलेल्या व्यक्तींच्या ताब्यात स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत तयार केलेल्या केबल इन्टरनेट नेटवर्क देण्याचा घाट स्मार्ट सिटी प्रशासनामार्फत घातला जात आहे. भ्रष्टाचार करण्याच्या खटाटोपात पिंपरी-चिंचवड शहराची वाट लावण्याचा हा प्रकार अत्यंत दुर्दैवी आहे. शहरातील नागरिकांच्या खासगी आयुष्याशी खेळ करणाऱ्या या प्रकरणाची सखोल चौकशी करुन सदर निविदा त्वरित रद्द करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी महापालिका आयुक्तांकडे शेखर सिंह यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केल्याची माहिती पत्रकार परिषदेत दिली.



अजित गव्हाणे म्हणाले की, पिंपरी चिंचवड शहरात स्मार्ट सिटी अंतर्गत सुमारे ६०० किलोमीटर लांबीचे अंडरग्राऊंड केबल इंटरनेट डक्ट तयार करण्यात आले. तत्कालिन महापालिका आयुक्त श्रावण हार्डीकर यांनी महापालिकेसाठी नवीन उत्पन्नाचा स्त्रोत म्हणून हा प्रकल्प हाती घेतला होता. महापालिकेला त्यातून भरघोस उत्पन्न मिळणे अपेक्षित आहे. या प्रकल्पामुळे अंडरग्राऊंड केबलसाठी विविध कंपन्यांकडून वारंवार होणाऱ्या रस्ते खोदाईलाही आळा बसणार आहे. डक्ट भाडेपट्ट्याने देण्यासाठी स्मार्ट सिटी प्रशासनाने सुमारे ३०० कोटी रुपयांची एक निविदा नुकतीच प्रसिध्द केली. अवघ्या तीन कंपन्यांनी त्यात सहभाग घेतला. मेसर्स रेलटेल कॉर्पोरेशन, मेसर्स यु.सि.एन. केबल या दोन कंपन्यांशिवाय मेसर्स सुयोग टेलिमॅटिक्स लि. – मेसर्स फायबर स्टोरी कम्युनिकेशन प्रा.लि.या भागीदार कंपनीने निविदा भरली. सुयोग टेलिमॅटिक्स लि.- फायबर स्टोरी कम्युनिकेशन प्रा.लि. या कंपनीची निविदा सर्वोत्कृष्ट ठरली आणि त्यांना काम देण्याची घाई स्मार्ट सिटी प्रशासनाकडून सुरू आहे.

### संचालकांचे पाकिस्तान, दुबई कनेक्शन !

दुबई आणि पाकिस्तानी नागरिकांच्या संपर्कातील तसेच बेकायदेशीर टेलिफोन एक्सचेंज चालविण्याचा आरोप असलेल्या रियाज अब्दुल अजीज शेख व ड्वेन मायकल परेरा यांना गुजरात पोलिसांनी अहमदाबाद येथे बेकायदेशीर टेलिफोन एक्सचेंज चालविण्याच्या गुन्ह्यात डिसेंबर २०२१ मध्ये अटक केली होती. अहमदाबाद येथील डी.सि.बी. पोलीस ठाण्यात रियाज अब्दुल अजीज शेख व ड्वेन मायकल परेरा यांच्या सह इतर जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. आता याच लोकांशी संबंधित कंपनीकडे पिंपरी चिंचवड शहराचे केबल इंटरनेट कनेक्शन सोपविण्याचा प्रकार हा अत्यंत गंभीर आणि देशविघातक सुध्दा ठरू शकतो.

ज्या कंपनीकडे शहराचे पूर्ण नेटवर्क सोपविण्यात येणार आहे त्यासंदर्भात अत्यंत गंभीर मुद्दे समोर आले आहेत. मे. सुयोग टेलीमॅटिक्स – मे. फायबर स्टोरी कम्युनिकेशन्स प्रा. ली. भागीदार कंपनीची निविदा सर्वोत्कृष्ठ ठरवून ती निविदा मान्य करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या कंपनी मधील मे. फायबर स्टोरी कम्युनिकेशन्स प्रा. ली. या कंपनीबाबत अत्यंत धक्कादायक माहिती आमच्या हातात आली आहे.

## संपादकीय »

# कवच जुन्या पेन्शनचे, आर्थिक ताणाचे

***रिझर्व्ह बँक आणि १५ व्या वित्त आयोगानं राज्यांच्या वाढत चाललेल्या वित्तीय तुटीचा उल्लेख वारंवार केला आहे. राज्यांचं घटत चाललेलं कररूपी उत्पन्न, वीज वितरण कंपन्यांचा वाढीव तोटा, शेती कर्जातली तूट आणि शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या धनानुदानातील वाढ यासारख्या मारक आर्थिक परिस्थितीत काही राज्यांनी जुन्या निवृत्तिवेतन योजनेची घोषणा करणं हे आणि या योजनेची अंमलबजावणी करणं, हे राज्यांना अधिकाधिक दिवाळखोरीकडे नेणारं आहे.***

एखादा महत्त्वाचा धोरणाधिष्ठित निर्णय केवळ राजकीय गरज म्हणून घ्यायचा, की त्याचे दूरगामी आर्थिक परिणाम, पुढच्या पिढ्यांच्या दृष्टीनं त्या परिणामांची इष्टानिष्टता यासंबंधी सारासार विचार करून निर्णय घ्यायचा, हे सरकारनं निश्चितपणे ठरवलं पाहिजे. हे पुन्हा सांगण्याचं कारण म्हणजे 'जुन्या निवृत्तिवेतन योजने'चा काही राज्यांनी आळवलेला सूर. राजस्थान, पंजाब, छत्तीसगड आणि झारखंड ह्या राज्यांनी जुनी निवृत्तिवेतन योजना पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. पश्चिम बंगालनं तर 'नवीन निवृत्तिवेतन योजने'चा कधीच स्वीकार केला नाही. जुन्या योजनेकडे जाण्याचे आश्वासन देऊन हिमाचल प्रदेशात कॉंग्रेस नुकतीच सत्तेवर आली आहे.निवृत्तिवेतनाची रक्कम 'घसघशीत' असावी, निश्चित फायद्याची असावी ही निवृत्त कर्मचाऱ्याची मानसिकता असणं स्वाभाविक आहे. जुन्या योजनेतून ही मानसिकता बऱ्यापैकी पूर्णत्वास जाणं हे देखील शक्य झालं. उदाहरणार्थ कर्मचाऱ्याला निवृत्तीच्या वेळीस जो शेवटचा पगार मिळेल, त्याच्या ५० टक्के निवृत्तिवेतन आणि महागाई भत्ता किंवा मागील १० महिन्यातील सरासरी वेतन ह्यापैकी जी रक्कम अधिक असेल तीही निवृत्तिवेतनाबरोबर मिळणार. ह्याला 'निश्चित (व्याख्यानुरूप) फायद्याची योजना' असं म्हटलं गेलं. नवीन निवृत्तिवेतनाचं स्वरूप 'निश्चित योगदानाची(कॉंट्रिब्युशन) योजना" असं आहे. म्हणजे निवृत्तिवेतन सरकारच्या (केंद्र आणि राज्य) आणि कर्मचाऱ्याच्या योगदानावर अवलंबून आहे. उदाहरणार्थ, कर्मचाऱ्याचं १० टक्के आणि सरकारचं १४ टक्के योगदान व त्यातून जो निधी तयार होईल त्यातून कर्मचाऱ्याला काही हिस्सा एकरकमी मोबदला म्हणून द्यायचा आणि उरलेल्या हिश्यातून निवृत्तिवेतन चालू करायचे. (उदा. खासगी क्षेत्रातल्या कर्मचाऱ्याला दिला गेला पर्याय ४० व ६० टक्के) अशी ही 'नवीन निवृत्तीवेतन योजना'. वयस्कर व्यक्तीला 'सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा कवच हवं, ह्या उद्दिष्टानं सरकारनं १९९९मध्ये 'ओअेसिस' (ओल्ड अेज सोशल ऍण्ड इन्कम सिक्युरिटी) हा प्रकल्प हाती घेतला आणि या प्रकल्पाच्या अभ्यासातून तयार झालेल्या अहवालानं 'निश्चित योगदान निवृत्तीवेतन योजने'ची शिफारस केली.



## आनंदी सकाळ

# परमेश्वर आनंदरूप, चिरंतन आहे

परमार्थाचा विषय तसा खरोखरच कठीण आहे आणि सर्वांना नडणारा आहे. ज्याला हा विषय जाणून घ्यायचा असेल त्याला, मी कोण हे जाणण्यापेक्षा, मी कोण नव्हे हे जाणणे महत्त्वाचे आहे. एखाद्या पाऊलवाटेने जात असताना ती वाट चुकलो आणि आपण भलत्या मार्गाला लागलो तर त्यापुढला सर्व व्यवहार चुकत जाणार. एखादे गणित सोडविताना एखाद्या आकड्याची चूक झाली की त्यापुढले सर्व गणित चुकत जाते किंवा एखाद्या रोगाचे निदान बरोबर झाले नाही तर मग त्या रोगावर केलेली औषधयोजना फुकट जाते, त्याप्रमाणे मनुष्याच्या सर्वसामान्य गुणधर्मांचे आकलन जर बरोबर झाले नाही, तर या गुणधर्मावर आधारलेला परमार्थाचा मार्गही जाणणे फार कठीण गोष्ट होईल. आपण आनंदी असावे, नेहमी आनंदात रहावे, असे सर्वांनाच वाटते; हा झाला पहिला गुणधर्म. या आनंदात चिरंतन असावे, निदान आनंदाच्या अपेक्षेत तरी चिरंतन रहावे, असेही आपल्याला वाटते.

# महामार्गाचा खटाटोप कुणासाठी?



## भूमिका

समृद्धी महामार्गामुळे मुंबई ते नागपूर हे अंतर अवघ्या आठ तासांत कापता येईल, अशी जोरदार जाहिरातबाजी केली जात असली, तरीही ही जाहिरात चारचाकी वाहने विचारात घेऊन करण्यात आली आहे. ही वाहने महामार्गावर सामान्यपणे १०० किलोमीटर प्रतितास किंवा त्याहीपेक्षा अधिक वेगाने धावतात. एवढा वेग घातक ठरू शकतो. शिवाय एवढ्या मोठ्या रस्ते प्रवासासाठी मोठ्या प्रमाणात इंधन जाळावे लागते. थोडक्यात हा प्रवास सुरक्षितता आणि पर्यावरणाच्या निकषावर योग्य ठरत नाही. तरीही कोणत्याही महामार्ग प्रकल्पाची जाहिरात थोड्याफार फरकाने याच निकषांवर केली जाते.



**कमी खर्चात, कमी वेळात रस्तेबांधणी**

प्रत्येक रस्ते प्रकल्पात काही खर्च स्पष्ट नमूद असणे गरजेचे आहे. प्रकल्पाच्या एकूण खर्चात जमीन संपादनाचा एकूण खर्च, प्रति हेक्टर खर्च तसेच बांधकामाचा एकूण खर्च व प्रति किलोमीटर खर्च, स्टील आणि सिमेंटवर होणारा खर्च नमूद करणे महत्त्वाचे आहे. ते निश्चित करण्याचा निकष म्हणून १९९८-२००२ या कालावधीत बांधण्यात आलेल्या पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गाच्या बांधकामावर करण्यात आलेला खर्च गृहीत धरता येईल. या महामार्गाच्या बांधकामासाठी प्रति किलोमीटर १५ कोटी रुपये खर्च झाला होता.

तेव्हापासून आजवर स्टील, सिमेंट, अन्य साहित्य आणि कामगारांवर होणाऱ्या खर्चातील वाढ विचारात घेऊन एक सूत्र तयार करता येईल. त्याआधारे भविष्यात प्रत्येक रस्ते बांधकाम प्रकल्पासाठी किती खर्च होऊ शकेल, हे दर्शवणारे सॉफ्टवेअर विकसित करता येईल. याद्वारे खर्च नियंत्रणात ठेवणे शक्य होईल. ही व्यवस्था अस्तित्वात आल्यास रस्तेबांधणी प्रकल्प कमी वेळ व पैशांत आणि भ्रष्टाचार न होता पूर्ण होऊ शकतील. आज आपल्याकडे अशी कोणतीही साधने नाहीत. ही व्यवस्था पूर्णपणे निविदाप्रक्रियेवर आधारित आहे. निविदेच्या स्पर्धेत जिंकायचे तर किंमत कमी ठेवावी लागते, जी प्रत्यक्ष प्रकल्पासाठी अपुरी ठरते.

कोणताही महामार्ग बांधताना पर्यावरण आणि समाजातील उपेक्षित घटकांचा संवेदनशीलतेने विचार होणे गरजेचे आहे. रस्तेबांधणीसंदर्भातील कोणतेही निर्णय घेताना भविष्यात वाढणाऱ्या गर्दीचाही अंदाज बांधावा लागेल. केवळ वेगाच्या मागे न धावता, ज्यात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाही समावेश करून घेता येईल अशा मध्यम वेग असलेल्या प्रवासाला- प्राधान्य देणे हितकारक ठरेल. त्यातून प्रति किलोमीटर प्रवासाचा खर्च कमी करता येईल. स्वच्छ इंधनाचा वापर करता येईल. वाहतूककोंडीचा प्रश्न सुटेल आणि सर्वसामान्य माणसांसाठी प्रवास सुकर होईल.एकूण वाहतुकीत चारचाकी, बस आणि ट्रकचे प्रमाण किती असू शकेल, याचाही अंदाज बांधणे गरजेचे आहे. पथकरासंदर्भातील धोरण निश्चित करताना या अंदाजांचा उपयोग होईल. बसगाड्यांना पथकर आकारला जात नाही. त्यामुळे महसुलात जी घट होते, ती चारचाकींना १५ टक्के अधिक पथकर आकारून भरून काढता येईल.

# आकाशाला गवसणी घालण्याची संधी!

**एव्हाना वडापाव, भजी, कंपनीचा चहा-नाश्ता समोर आला. वातावरण आल्हाददायक होते. एसीचा गारवा भर उन्हातदेखील जाणवत होता, पण मिरच्या न खाताच चारही उमेदवारांच्या डोळ्यांतून 'ढगफुटी' झाली होती.**

सुयोग्य व अपेक्षेपेक्षा जास्त पगार मिळण्याचा आनंद उमेदवारांच्या डोळ्यांत होता. सोबत मोकळ्या आकाशाला गवसणी घालण्याची अमर्याद संधीही तरुण पंखांना मिळाली होती. मी घेतलेल्या 'टेस्ट' योग्य आहेत की नाही याबद्दल मतमतांतरे असू शकतील. सर्वत्र सरधोपटपणे वापरता येईल असे तर मुळीच नाही हेदेखील महत्त्वाचे, मात्र स्वप्नवत वाटावा असा हा खराखुरा स्वानुभव म्हणजे जस्ट एक सॅम्पल-दी रियल स्टोरी ऑफ 'लिटमस वडापाव'!

माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम जेव्हा ट्रिपल आयटी अलाहाबादमध्ये आले तेव्हा त्यांनी मी केलेले प्रयोग आणि बदल सोबत फिरून पाहिले. ४५ मिनिटांच्या संवादानंतर अतिशय प्रेमळपणे मृदू आवाजात सर्व विद्यार्थ्यांसमोर माझी पाठ थोपटली व भाषणातदेखील माझा पूर्ण नावानिशी उल्लेख केला होता. देशभरातून आयआयटी लेव्हलचे क्रीम विद्यार्थ्यांना त्यांनी एक शिक्षक राष्ट्र निर्माण करण्यासाठी किती महत्त्वाचा



असतो हे सांगितले. 'ओन्ली नॉलेज विथ इट्स ॲप्लिकेशन ॲड विल पॉवर कॅन मेक इंडिया सुपर पॉवर! ॲन्ड द नेक्स्ट वॉर विल बी ओन्ली विथ नॉलेज ॲन्ड नॉन विथ मसल ऑर मनी!' असे माझ्या खांद्यावर हात ठेवत एपीजे म्हणाले होते.

पुढे 'प्रज्ञानम् ब्रम्ह' हेच ब्रीद घेऊन मी ट्रिपल आयटी अलाहाबादचा लोगो डिझाईन केला. मला रोख बक्षीस आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले आणि हा लोगो आजही ट्रिपल आयटी अलाहाबादची जागतिक ओळख बनत वापरला जात आहे. भारताची भावी हायटेक जनरेशन म्हणजे विद्यार्थी, मी आणि एपीजे असे एकत्र कितीतरी क्लिक झालेले फोटो आजही ट्रिपल आयटी अलाहाबादमध्ये आहेत. भूतकाळाच्या फोटोंच्या प्रकाशातून बाहेर पडत आठवणीतील 'फ्लॅशबॅक' संपत नव्या वर्तमानाची जाणीव मला झाली. डोळे उघडले तेव्हा पुढचा विचार होता तो फक्त प्रामाणिकपणे ही नवी जबाबदारी पार पाडण्याचा!

१. पुढच्या क्षणी चौघांना एकत्रित आपापल्या फाईल घेऊन केबिनमध्ये मी बोलावले. फाईल न पाहता त्यांना त्या बाहेर ठेवण्यास सांगितले. प्रश्नार्थक चेहऱ्याने कोणीच काही न बोलता चौघे जण फाईल बाहेर ठेवून केबिनमध्ये पुन्हा हजर झाले.

२. त्यानंतर मी खिशातून १० रुपयांच्या ४ कोऱ्या करकरीत नोटा काढून टेबलावर ठेवल्यात. कोणीही एकमेकांशी न बोलता ३० मिनिटांत प्रत्येकाने एक वडापाव आणून थेट माझ्या केबिनमध्ये टेबलवर ठेवून पुन्हा बाहेर वेटिंग रूममध्ये वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन बसायचे आणि जाताना फोन, बॅग रिसेप्शन काऊंटरवर लॉकरमध्ये जमा करून

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## कानडी सरकारच्या निषेधासाठी महाराष्ट्र एकीकरण समितीचं

# चलो कोल्हापूर!

### ▸ 26 डिसेंबरला कोल्हापुरात धरणे आंदोलन

। बेळगाव । महाईन्यूज ।

कर्नाटक सरकारने महाराष्ट्र एकीकरण समितीच्या महामेळाव्याला विरोध केल्याच्या निषेधार्त समितीने आता 'चलो कोल्हापूर'ची हाक दिली आहे. सोमवार, 26 डिसेंबर रोजी महाराष्ट्र एकीकरण समितीच्या वतीनं कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आदोलन करून कर्नाटकच्या दडपशाहीचा निषेध करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र एकीकरण समितीने बेळगावात होणाऱ्या कर्नाटक विधीमंडळाच्या अधिवेशनाला विरोध करण्यासाठी महामेळाव्याचं आयोजन केलं होतं. या महामेळाव्याला कर्नाटक सरकारने परवानगी नाकारली आणि दडपशाहीच्या माध्यमातून मए समितीच्या नेत्यांना आणि



कार्यकर्त्यांना अटक केली. त्याचा निषेध म्हणून आता समितीच्या वतीनं कोल्हापूरात आंदोलन करण्यात येणार आहे.

कोल्हापुरात करण्यात येणाऱ्या या आंदोलनासाठी दोन ते अडीच हजार कार्यकर्ते बेळगावहून कोल्हापूरला येणार असल्याची माहिती समितीच्या वतीनं देण्यात येणार आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीची आज मराठा मंदिर येथे बैठक पार पडली. या बैठकीत सगळ्यांची मते जाणून घेऊन कोल्हापूरला जाऊन धरणे आंदोलन छेडण्याचा निर्णय घेण्यात आला.बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार मनोहर किणेकर होते.

बेळगावात आंदोलन केले तर कर्नाटकी पोलीस आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करणार. यासाठी कार्यकर्त्यांनी कोल्हापूरला जाऊन आंदोलन करावे अशी इच्छा बैठकीत व्यक्त केली. महाराष्ट्र सरकारने देखील एक दिवस महाराष्ट्र बंद करून आपण सीमावासियांच्या पाठीशी आहोत असे कर्नाटक सरकार आणि कन्नड संघटनांना दाखवून द्यावे असेही बैठकीत मत व्यक्त करण्यात आले.

महाराष्ट्र एकीकरण समितीच्या वतीनं पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री यांच्या नावे कोल्हापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना मराठी भाषिकांच्या वर होत असलेल्या अन्यायाबाबत निवेदन देण्यात येणार आहे. आज झालेल्या बैठकीला माजी महापौर मालोजी अष्टेकर, प्रकाश मरगाळे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्राला एक इंचभरही जमीन न देण्याचा पुनरूच्चार कर्नाटक विधिमंडळात मुख्यमंत्री बोम्मई यांनी केला आहे. याबाबत विधिमंडळात ठराव मांडण्यात येणार असल्याची माहितीही कर्नाटकाचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी दिली.

## जुनी पेन्शन योजना लागू होणार नाहीच!

। मुंबई । महाईन्यूज ।



राज्यात जुनी पेन्शन लागू करण्याची मागणी करणाऱ्या शिक्षकांना, कर्मचाऱ्यांना राज्य सरकारने मोठा धक्का दिला आहे. जुनी पेन्शन योजना लागू होणार नसल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत) स्पष्ट केले. जुनी पेन्शन योजना लागू केल्यास राज्य दिवाळखोरीत निघेल असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी अनेक आंदोलन करण्यात आली होती.

भाजप आमदार राम सातपुते यांनी विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांचे वेतन आणि त्यांचा प्रश्न उपस्थित केला. विनाअनुदानित संस्थांकडून शिक्षकांचे शोषण होत असल्याचे त्यांनी म्हटले. विनाअनुदानित शिक्षण संस्थेत 2001पूर्वी रुजू झालेले शिक्षक आता निवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत. या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू होईल का, असा प्रश्न केला. या प्रश्नाला उत्तर देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जुनी पेन्शन योजना लागू करता येणार नसल्याचे स्पष्ट केले. 2005 मध्ये पेन्शन योजना बंद झाली आहे. राज्याचे हित लक्षात घेऊन जुनी पेन्शन योजना रद्द करण्यात आली. या पेन्शन योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर एक लाख 10 हजार कोटींचा बोझा पडेल. यातून राज्य दिवाळखोरीत निघेल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. राज्याच्या हिताचा निर्णय घेतल्याबद्दल फडणवीस यांनी अजित पवार यांचेही अभिनंदन केले.फडणवीस यांनी म्हटले की, 2019 मध्ये राज्य सरकारने विनाअनुदानित शाळांना 20 टक्क्यांवरून 40 टक्क्यांपर्यंत अनुदान दिले. त्यावेळी 350 शाळा होत्या. त्यानंतर या निर्णयाच्या अंमलबजावणीचा काळ येईपर्यंत शाळांची संख्या 3900 इतकी झाली.

## पुन्हा मास्क, पुन्हा निर्बंध? कोरोनाबाबत फडणवीसांची घोषणा

। मुंबई । महाईन्यूज ।

कोरोना संपला, अशी परिस्थिती निर्माण होत असतानाच आता पुन्हा एकदा हा विषाणू उफाळून आला आहे. त्याच पार्श्वभूमीवर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक मोठी घोषणा केली आहे.

राज्यासह केंद्रातही कोरोनाची परिस्थिती चिंताजनक होत आहे. गेल्या काही दिवसांमध्ये रुग्णसंख्येत वाढ झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्यात कोरोना परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी टास्क फोर्स नेमण्यात येणार आहे.

हा टास्क फोर्स राज्यातल्या कोरोना परिस्थितीबाबत सरकारला सूचना करणार आहे. विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनामध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा केली आहे. त्यामुळे आता पुन्हा निर्बंध लागणार, पुन्हा मास्क लावावा लागणार का, असा प्रश्न जनतेसमोर आहे.

तर चीनमध्ये पुन्हा एकदा कोरोनाची आकडेवारी वाढत आहे. या पार्श्वभूमीवर आता केंद्र सरकारही सतर्क झालं आहे.

केंद्र सरकारकडून सर्व केंद्रशासित प्रदेश आणि राज्यांना पत्र पाठवण्यात आली आहेत. तसंच बाधितांच्या नमुन्यांचे जिनोम सिक्वेन्सिंग करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आज केंद्रीय स्तरावर याबाबत बैठकही होणार आहे. त्यानंतर निर्बंधांबद्दल महत्त्वाची माहिती समोर येऊ शकते.

## ग्रामपंचायत निवडणुका चिन्हावर लढत नाहीत

### खासदार संजय राऊतांचं भाजपवर टीकास्त्र

। मुंबई । महाईन्यूज ।

**राज्यात निवडणूक लागलेल्या 7 हजार 682 ग्रामपंचायतीपैकी भाजपनं एकूण 2 हजार 23 ग्रामपंचायतींवर विजय मिळवत पहिला क्रमांक पटकावलाय. तर, राष्ट्रवादी काँग्रेसनं 1 हजार 215 ग्रामपंचायतींवर वर्चस्व मिळवलंय. शिंदे गटानं ठाकरे गटापेक्षा जास्त ग्रामपंचायती ताब्यात घेतल्या आहेत.**



या निकालावर खासदार संजय राऊत यांनी ट्विटद्वारे भाष्य केलंय. एक दिवस अगोदरच आम्हीच पहिल्या नंबरवर आहोत, असं म्हणणाऱ्या मंडळींनी राज्यातील त्यांचे सरपंच आणि सदस्य यांची यादी जाहीर करावी, म्हणजे प्रश्न मिटला. जोरात खोटे बोलल्याने काही काळ भ्रम निर्माण होईल. ग्रामपंचायत निवडणुका चिन्हावर लढत नाहीत. तेव्हा उगाच आकडा लावून काय करणार? अशी टीका त्यांनी भाजपवर केलीये.

| भाजपकडं सर्वाधिक सरपंच | |
|---|---|
| भाजप | 1 हजार 873 |
| राष्ट्रवादी | 1007 |
| शिंदे गट | 709 |
| ठाकरे गट | 571 |
| काँग्रेस | 657 |
| इतर | 967आहे. |

राज्यातील ग्रामपंचायतीसाठी रविवारी (18 डिसेंबर) मतदान झालं होतं. त्यानंतर काल (20 डिसेंबर) या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. त्यामध्ये भाजपनं 2 हजार 23, राष्ट्रवादीनं 1 हजार 215, शिंदे गट 772, काँग्रेसनं 861, ठाकरे गट 639 तर इतर पक्षांनी 1 हजार 135 ग्रामपंचायतींवर विजय मिळवला आहे. या निकालावर खासदार संजय राऊत यांनी ट्विटद्वारे भाष्य केलंय. एक दिवस अगोदरच आम्हीच पहिल्या नंबरवर आहोत, असं म्हणणाऱ्या मंडळींनी राज्यातील त्यांचे सरपंच आणि सदस्य यांची यादी जाहीर करावी, म्हणजे प्रश्न मिटला. जोरात खोटे बोलल्याने काही काळ भ्रम निर्माण होईल. ग्रामपंचायत निवडणुका चिन्हावर लढत नाहीत. तेव्हा उगाच आकडा लावून काय करणार? अशी टीका त्यांनी भाजपवर केलीये.

शॉर्ट न्यूज »

## मणिपूरमध्ये भीषण अपघात!

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

मणिपूरच्या नोनी जिल्ह्यात स्कूल बसाला भीषण अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातात स्कूलबस उलटून पाच विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. यादरम्यान 20 जण जखमी झाले आहेत. मणिपूरची राजधानी इंफाळपासून 55 किमी अंतरावर लोंगसाई भागाजवळ ओल्ड कछार रोडवर हा अपघात झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, थम्बलानू हायर सेकंडरी विद्यालयातील विद्यार्थी दोन बसमधून नोनी जिल्ह्यातील खौपुम येथे वार्षिक शालेय अभ्यास दौऱ्यावर गेले होते. विद्यार्थिनी ज्या बसमध्ये प्रवास करत होत्या, ती बस चालकाचे नियंत्रण सुटल्याने उलटली.मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांना या अपघातावर प्रतिक्रिया देताना, आज ओल्ड कछार रोडवर शाळकरी मुलांना घेऊन जाणाऱ्या बसच्या अपघाताबद्दल ऐकून खूप दुःख झाले.

# "एक इंचही जागा महाराष्ट्राला देऊ नका"

## काँग्रेसच्या माजी मुख्यमंत्र्यांचं विधान

।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

**कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मईंनी यांनी सोलापूर आणि सांगलीतील गावांवर दावा सांगितला होता. तेव्हापासून महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद प्रश्न चिघळला आहे. त्यात महाराष्ट्राला इंचभरही जमीन देणार नाही, असा ठराव कर्नाटक विधिमंडळात मांडण्यात येणार आहे. त्यामुळे कर्नाटकडून पुन्हा महाराष्ट्राच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केलं जातं आहे.**



अशात कर्नाटक विधिमंडळात बोलताना काँग्रेसचे नेते आणि माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनीही महाराष्ट्रावर आगपाखड केली. "कर्नाटकातील एक इंचही महाराष्ट्राला देऊ नका. अशा पद्धतीचे पत्र संसदेच्या दोन्ही सभागृहाला द्या," अशी मागणी सिद्धरामय्या यांनी केली आहे. त्याला प्रत्युत्तर देताना बसवराज बोम्मई यांनी म्हटलं की, "सत्ताधारी आणि विरोधकांचं एकमत झाल्यावर संसदेच्या दोन्ही सभागृहाला पत्र पाठवेन," असं बोम्मईंनी सांगितलं.

**काँग्रेसचे नेते आणि माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनीही महाराष्ट्रावर आगपाखड केली. "कर्नाटकातील एक इंचही महाराष्ट्राला देऊ नका. अशा पद्धतीचे पत्र संसदेच्या दोन्ही सभागृहाला द्या," अशी मागणी सिद्धरामय्या यांनी केली आहे. त्याला प्रत्युत्तर देताना बसवराज बोम्मई यांनी म्हटलं की, "सत्ताधारी आणि विरोधकांचं एकमत झाल्यावर संसदेच्या दोन्ही सभागृहाला पत्र पाठवेन," असं बोम्मईंनी सांगितलं.**

दरम्यान, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावरून सिद्धरामय्या यांनी ट्वीट करत बोम्मई यांच्यावर टीका केली आहे. "सीमाप्रश्न सातत्याने ज्वलंत ठेवणे हा महाराष्ट्राचा डाव आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सीमाप्रश्नावरून बैठक बोलवायला नको होती. तसेच, या बैठकीत मुख्यमंत्री बोम्मई यांनी उपस्थित राहायला हवे नको होतं," असं सिद्धरामय्या यांनी म्हटलं आहे.

"महाराष्ट्र आणि कर्नाटक मंत्र्यांची समिती स्थापन करणे योग्य नाही. मुख्यमंत्री बोम्मई यांनी याला स्पष्ट नकार दिला असेल, अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि केंद्रात भाजपाचेच सरकार आहे. त्यामुळे अमित शाहांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना सीमाभागात सुरु असलेली आंदोलने थांबवण्यासाठी समज द्यायला हवी होती," असेही सिद्धरामय्यांनी म्हणाले.

# शिंदे-फडणवीस सरकारने धनगर आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करावी - सुळे

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

सध्या राज्यात आणि देशात हिवाळी अधिवेशन सुरू आहे. दोन्ही सत्ताधारी आणि विरोधक ऐकमेकांना कोंडीत पकडण्यासाठी प्रयत्न करत आहेत. आज लोकसभेत खासदार सुप्रिया सुळे यांनी धनगर आरक्षणा मुद्दा उपस्थित केला. कालपर्यंत धनगरांना आरक्षण मिळायला हवे अशी शिवसेनेची (शिंदे गट) भूमिका होती. परंतु आज त्यांचे मंत्री राजेंद्र गावित हे धनगरांना आरक्षण नको असे म्हणाले. नेमकी धनगर आरक्षणाबाबत शिवसेनेची भूमिका काय? असा प्रश्न सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला. धनगर समाजाशी खोटे आश्वासन देऊन भाजपा सत्तेत आली. शिंदे-फडणवीस सरकार धनगरांची फसवणूक करत आहे, असा आरोप सुप्रिया सुळे यांनी केला. त्यामुळे भाजपाने धनगर आरक्षणाबाबत आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी लोकसभेत केली.

तसेच, आम्ही कोणत्याही समाजाचे आरक्षण कमी करत नसून ते तसेच राहिले पाहिजे. इतरांना वेगळे आरक्षण देण्यात यावे, अशीच भूमिका आमच्या



महाविकास आघाडीची आहे, असे सुप्रिया सुळे यांनी स्पष्ट केले.दरम्यान, गेल्या अनेक वर्षांपासून धनगर समाज आपल्याला आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी करत आहे. मात्र, याला आता बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे खासदार राजेंद्र गावित यांनी विरोध केला आहे. लोकसभेत धनगर समाजाला आदिवासी आरक्षण देण्यास राजेंद्र गावित यांनी विरोध दर्शवला आहे. यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आक्षेप घेतला. महाराष्ट्रात सध्या धनगर समाजाला NT अंतर्गत आरक्षण आहे. मात्र, धनगर समाजाने अनुसूचित जमातींमध्ये (ST) समावेश करण्याची मागणी सातत्याने लावून धरली आहे. मात्र, धनगर आरक्षणाचा मुद्दा हा राज्याच्या नाही तर केंद्राच्या अखत्यारित येतो. त्यामुळे राज्य सरकारने केंद्राकडे पाठपुरावा करण्याची मागणी धनगर समाजाने सातत्याने केली. देवेंद्र फडणवीस यांनी 2014 मधील विधानसभा निवडणुकीपूर्वी धनगर आरक्षणाचे आश्वासन दिले होते. पण त्यांचा पाच वर्षांचा कार्यकाळात धनगरांना अनुसूचित जमातीमधील आरक्षण मिळाले नाही.",

**, गेल्या अनेक वर्षांपासून धनगर समाज आपल्याला आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी करत आहे. मात्र, याला आता बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे खासदार राजेंद्र गावित यांनी विरोध केला आहे. लोकसभेत धनगर समाजाला आदिवासी आरक्षण देण्यास राजेंद्र गावित यांनी विरोध दर्शवला आहे. यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आक्षेप घेतला. महाराष्ट्रात सध्या धनगर समाजाला NT अंतर्गत आरक्षण आहे. मात्र, धनगर समाजाने अनुसूचित जमातींमध्ये (ST) समावेश करण्याची मागणी सातत्याने लावून धरली आहे.**

# कोरोना अद्याप संपलेला नाही; केंद्रीय आरोग्य मंत्र्याचं मोठं विधान

## कोरोनाच्या संकट घोंघावत असल्याचे संकेत

।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

कोरोना अद्याप संपलेला नाही, असं मोठं विधान केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मांडवीय यांनी उच्चस्तरीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत केलं आहे. त्यामुळं देशात पुन्हा कोरोनाच्या संकट घोंघावत असल्याचे संकेत देण्यात आले आहेत. त्याचबरोबर यासंदर्भात सर्व यंत्रणांना ॲलर्ट राहण्याचे आदेशही आरोग्यमंत्र्यांनी दिले आहेत. आरोग्यमंत्र्यांनी ट्विटद्वारे बैठकीची माहिती दिली. त्यांनी म्हटलं की, काही देशांमध्ये कोरोनाच्या वाढत्या प्रकरणं पाहता आज आम्ही भारतातील कोरोनाच्या स्थितीचा तज्ज्ञांच्या आणि अधिकाऱ्यांमार्फत आढावा घेतला. कोविड अद्याप संपलेला नाही. यावेळी सर्व संबंधितांना ॲलर्ट आणि जागरुकता वाढवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, कोणतीही परिस्थिती हाताळण्यासाठी आम्ही सज्ज आहोत.

आरोग्यमंत्र्यांनी ट्विटद्वारे बैठकीची माहिती दिली. त्यांनी म्हटलं की, काही देशांमध्ये कोरोनाच्या वाढत्या प्रकरणं पाहता आज आम्ही भारतातील कोरोनाच्या स्थितीचा तज्ज्ञांच्या आणि अधिकाऱ्यांमार्फत आढावा घेतला. कोविड अद्याप संपलेला नाही.




### चीनमधील नव्या व्हेरियंटी चर्चा

**दरम्यान, बैठकीबाबत नीती आयोगाचे प्रमुख व्ही. के. पॉल यांनी मीडियाशी बोलताना सांगितलं की, कोरोनाच्या जागतीक परिस्थितीवर आज केंद्रीय मंत्री आरोग्य मंत्र्यांच्या उपस्थित चर्चा झाली. कोरोनाच्या बाबतीत आपण सतर्क आहोत. चीनमध्ये कोरोनाचे रुग्ण वाढले आहेत. या बैठकीत चीनच्या नवीन व्हेरिअटची चर्चा झाली. भारतातील सर्व रुग्णालातील न्युमोनियाच्या रुग्णांची योग्य तपासणी केली जाईल. यासंदर्भात प्रत्येक आठवड्यात बैठक होईल.**

### नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी?

**लक्षणं असतील तर कोरोना टेस्ट करा. ज्यांनी प्रतिबंधात्मक डोस घेतला नसेल तर त्यांनी डोस घ्यावा, गर्दीच्या ठिकाणी मास्क घालावा, असं आवाहनही आरोग्य मंत्र्यांकडून करण्यात आलं आहे.**



# प्रेमासाठी काय पण! कावेरीसाठी राज गुहागरमध्ये..

कलर्स मराठीवरील भाग्य दिले तू मला मालिका आता रंजक वळणावर येऊन पोहचली आहे. कावेरी समोर वैदेहीचा खरा चेहरा आला आणि तिने राज आणि वैदेहीचे लग्न थांबवले. कावेरीचे राजवर प्रेम आहे हे वैदेहीला पहिल्यापासून माहिती असून ती अनभिज्ञ आहे असे दाखविले यामुळे कावेरी दुखावली गेली. तिने सगळ्यांसमोर वैदेहिचा पर्दाफाश केला आणि राजवर तिचे अपर प्रेम आहे अशी कबुली दिली. पण तात्यांनी मात्र याला नकार दिला आहे.. त्यामुळे आता खरी राज आणि कावेरीच्या प्रेमाची परीक्षा सुरू झाली आहे. राज आणि वैदेहीचे लग्न मोडल्यानंतर तात्या कावेरीला तिथून घेऊन गुहागरला निघून गेले. आता राजसमोर खूप मोठे आव्हान आहे जे तात्यांनी त्याला दिले आहे. तात्यांनी राजला चॅलेंज दिले आहे की या गावात राहून दाखव.. कमवून दाखव... तर कावेरीचा हात तुझ्या हातात देईन. ते आव्हान राजने स्वीकारले आहे.

आता मालिकेत मोठा ट्विस्ट येणार आहे. या चॅलेंजमध्ये राज स्वतःला कसं सिध्द करेल ? कसं हे आव्हानं पूर्ण करेल ? हे बघणे उत्सुकतेचे असणार आहे.

आता राज कावेरीसाठी गुहागरमध्ये राहणार आहे. मालिकेमध्ये पुढे राज विटांच्या भट्टीवर राबताना दिसणार आहे. शेतकाम तसेच टेम्पो ड्रायव्हर चे काम करताना दिसणार आहे. तात्यांच्या टपरीवर धुणे भांडी चे काम देखील करताना दिसणार आहे.

अखेर प्रेक्षक जे क्षण बघायला आतुर होते ते मालिकेत बघायला मिळणार आहे. राज कावेरी मध्ये आता प्रेम बहरू लागले आहे... त्यांच्यातील काही रोमँटिक क्षण मालिकेत बघायला मिळणार आहे. तसेच एक सरप्राइज देखील आहे जे लवकरच प्रेक्षकांना कळेल. कावेरीच्या प्रेमापोटी राज हे करण्यास तयार होतो...पण आता त्यांचा लग्नापर्यंतचा प्रवास कसा असेल हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत.

# दीपिकाची 'भगवी' बिकीनी तयार केली, शालीनची 'लॉटरीच' लागली!



पठाणमधील बेशरम रंग पाहिलं नाही असं कुणी सापडणं आता अवघड आहे. असं चित्र आहे. सोशल मीडियावर त्याची मोठ्या प्रमाणात चर्चाही सुरु आहे. आता तर अयोध्येतील संत परमहंसदास यांनी शाहरुखला जिवंत जाळण्याची धमकी दिली आहे. त्यामुळे येत्या काळात पठाणचा वाद आणखी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून पठाण आणि त्या चित्रपटातील बेशरम गाणे याच्याशी संबंधित जोरदार वाद सुरु झाला आहे. पठाणमध्ये शाहरुख खान आणि दीपिका पदुकोण ही मुख्य भूमिकेत आहे. दीपिकानं परिधान केलेली भगव्या रंगातील बिकीनी ही तर अनेकांच्या डोळ्यात खुपली आहे. त्यावरुनं हिंदू महासभा आक्रमक झाली आहे. तिकडे मध्यप्रदेशमध्ये नरोत्तम मिश्रा यांनी काहीही झालं तरी पठाण हा प्रदर्शित होऊ

# ‘पठाण’मधील ‘बेशरम रंग’ नंतर ‘झूमे जो पठाण’



बॉलिवूड अभिनेता शाहरुख खानचा ‘पठाण’हा चित्रपट येत्या वर्षात प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट महिन्याभरापासून चर्चेत आहेत. परंतु ‘पठाण’ हा चित्रपट मागील काही दिवसांपासून वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. चित्रपटातील ‘बेशरम रंग’या गाण्याबद्दल काही लोक सतत विरोध करत आहेत. शिवाय या गाण्यामध्ये दीपिकाने भगव्या रंगाची बिकनी घालून हिंदूंच्या भावना दुखावल्याचा आरोप अनेकांकडून करण्यात आला आहे. या चित्रपटामुळे सामान्य व्यक्तींपासून राजकीय व्यक्तींपर्यंत अनेकजण आपली प्रतिक्रिया मांडू लागले आहेत. दरम्यान, अशातच आता या चित्रपटातील दुसऱ्या गाण्याचे पोस्टर देखील प्रदर्शित करण्यात आलं आहे.

‘पठाण’ चित्रपटातील ‘बेशरम रंग’ या गाण्यानंतर या चित्रपटातील दुसऱ्या गाण्याचे पोस्टर देखील शेअर करण्यात आले होते. या गाण्याचे नाव ‘झूमे जो पठाण’ असे असून यामध्ये शाहरुख आणि दीपिकाचा डान्स जिसत आहे. या फोटोमध्ये दीपिकाची आणि शाहरुखची स्टाईल चाहत्यांच्या पसंतीस उतरत आहे.

सध्या सोशल मीडियावर हे फोटो प्रचंड व्हायरल होत आहेत.

25 जानेवारी रोजी प्रदर्शित होणार चित्रपट

बॉलिवूड अभिनेता शाहरुख खान जवळपास 4 वर्षानंतर चित्रपटामध्ये झळकताना दिसणार आहे. शाहरुख खान सध्या त्याच्या आगामी चित्रपटांमुळे चर्चेत आहे.

# गौहर खानने दिली गुड न्यूज.. 39 व्या वर्षी होणार आई..



सध्या बॉलीवूडमध्ये अत्यंत आनंददायी वातावरण आहे. कारण रोज काहीतरी गोड बातमी समोर येत आहे. कुणी प्रेगनन्सीची न्यूज देत आहे तर कुणी मुलगा- मुलगी झाल्याची खबर. काजल अग्रवाल, सोनम कपूर, आलिया भट्ट आणि बिपाशा बासू या सगळ्या अभिनेत्री नुकत्याच आई झाल्याने त्यांच्या मातृत्वची चर्चा आहेच. अशातच बिग बॉस विजेती आणि मॉडेल गौहर खान नेदेखील गोड बातमी दिली आहे. गौहर खानच्या घरी नवा पाहुणा येणार आहे. गौहर खानने आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरून चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी दिली आहे. गौहर खान आणि जैद दरबार 25 डिसेंबर 2020 रोजी विवाह बंधनात अडकले. लॉकडाऊनच्या वेळी गौहर खान आणि जैद दरबारची भेट झाली, त्यानंतर त्यांची मैत्री सुरू झाली आणि या मैत्रीचे प्रेमात रूपांतर कधी झाले हे कळलेही नाही आणि दोघांनी लग्न केले आणि तब्बल दोन वर्षांनी त्यांनी गुड न्यूज दिली.जैद दरबारचे वडील इस्माईल दरबार हे प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक आहेत. तर आपण गौहर खानने बिग बॉसचा 7 वा सीझनची विजेती होती. गौहर खान सध्या प्रेग्नंट आहे आणि हे सांगण्यासाठी तिने इंस्टाग्रामवर एक अनोखा व्हिडिओ शेअर केला आहे. ज्याद्वारे तिने चाहत्यांना सांगितले की ती आणि तिचा पती जैद दरबार दोनाचे तीन होणार आहेत.

# सर्कस’मधील ‘आशिकी’ गाण्याला प्रेक्षकांची पसंती;




बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंहचा आगामी ‘सर्कस’ चित्रपट सध्या सर्वत्र चर्चेत आहे. येत्या काही दिवसातच हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. मनोरंजनाने परिपूर्ण असलेल्या या चित्रपटाने प्रेक्षकांचे भरघोस मनोरंजन केले जाणार असल्याचं म्हटलं जात आहे. मागील काही दिवसांपूर्वीच या चित्रपटातील ‘करंट लगा रे’ आणि ‘सुन जरा’ही दोन गाणी प्रदर्शित झाली होती यातील ‘करंट लगा रे’ गाण्यामध्ये रणवीरसोबत दीपिका देखील होती. या गाण्याला प्रेक्षकांनी भरपूर प्रेम दिलं. तर ‘सुन जरा’ गाण्यामध्ये रणवीरची पूजा आणि जॅकलीनसोबची केमिस्ट्री पाहायला मिळाली. दरम्यान, आता या चित्रपटातील तिसरं गाणं प्रदर्शित करण्यात आलं आहे.

‘आशिकी’मध्ये रणवीरसोबत पूजा आणि जॅकलीनची केमिस्ट्री

नुकत्याच काही वेळापूर्वी सर्कस चित्रपटातील ‘आशिकी’ गाणं प्रदर्शित करण्यात आलं. अवघ्या काही तासातचं या गाण्याला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. या गाण्यामध्ये रणवीरसोबत पूजा आणि जॅकलीन जबरदस्त डान्स करताना दिसत आहेत. शिवाय ‘सर्कस’मधील इतर कलाकार देखील दिसत आहेत. काही वेळातच या गाण्याला 3 लाखांपेक्षा जास्त व्ह्यूज मिळाल्या आहेत.‘सर्कस’मध्ये दिसणार जुळ्या भावांची गोष्टरोहित शेट्टी दिग्दर्शित सर्कस चित्रपट विल्यम शेक्सपिअरचे नाटक द कॉमेडी ऑफ एरर्स वर आधारित आहे. यामध्ये रणवीर सिंह डबल रोलमध्ये दिसणार आहे. रणवीर व्यतिरिक्त वरुण शर्मा देखील या चित्रपटात डबल रोलमध्ये दिसणार आहे. सर्कस या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि निर्मिती रोहित शेट्टीने केली असून यामध्ये रणवीर सिंह, पूजा हेगडे, जॅकलीन फर्नांडिस, वरुण शर्मा, जॉनी लीवर हे कलाकार महत्वाच्या भूमिकेत दिसतील.23 डिसेंबर 2022 रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

# अर्जेंटिनाला फिफा वर्ल्डकपचं सेलिब्रेशन भोवणार!

## अर्जेंटिनामध्ये कोरोना केसेस तब्बल 130 टक्क्यांनी वाढल्या

**। इंग्लंड ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



अर्जेंटिनाने तब्बल 36 वर्षानंतर फिफा वर्ल्डकपवर आपले नाव कोरले. यानंतर अर्जेंटिनाच्या विविध शहरात वर्ल्डकप विजयानंतर जोरदार सेलिब्रेशन करण्यात येत आहे. शहराच्या मुख्य चौकात लोकांनी तुफान गर्दी केली आहे. याचबरोबर विश्वविजेत्या संघाचे राजधानीतून मिरवणूक देखील काढण्यात आली. यावेळी देखील लाखो लोक रस्त्यावर एकत्र जमले होते.

मात्र याचा फटका अर्जेंटिनाला मोठ्या प्रमाणावर बसण्याची शक्यता आहे. कारण गेल्या आठवड्याभरात अर्जेंटिनामध्ये कोरोना केसेस तब्बल 130 टक्क्यांनी वाढल्या आहेत. अर्जेंटिनामध्ये आतापर्यंत 98 लाख 29 हजार 236 कोरोना रूग्ण आढळून आले होते. तर 1 लाख 30 हजार लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

कोरोना रूग्णसंख्येवर नजर ठेवणाऱ्या वल्डोमीटर संस्थेनुसार अर्जेंटिनामध्ये गेल्या 7 दिवसात कोरोना रूग्णसंख्या 62 हजार 261 वर पोहचली आहे. तर 39 लोकांना आपला प्राण गमवावा लागला आहे. सध्या अर्जेंटिनात 1 लाख 1 हजार 989 ॲक्टिव्ह रूग्ण आहेत.

अर्जेंटिनाने फ्रान्सला पेनाल्टी शूटआऊटमध्ये 4 - 2 असे पराभूत केले. तेव्हापासून अर्जेंटिनाची राजधानी ब्यूनस आयर्समध्ये लाखो लोक रस्त्यावर आले होते. याची दृष्ये सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल झाली होती. वर्ल्डकप विजयानंतर ब्यूनस आयर्सच्या रस्त्यावर जवळपास 10 लाखांपेक्षा जास्त लोक जमा झाले होते. यावेळी संघाची बसमधून मिरवणूक देखील काढण्यात आली. मात्र लोकांची प्रचंड गर्दी झाल्याने संघाला एअरलिफ्ट करून बाहेर काढावे लागले.


### जगभरात कोरोनाची रूग्णसंख्या वाढतेय

**गेल्या सात दिवसात जगभरात एकूण 36 लाख 32 हजार 109 कोरोनाचे रूग्ण आढळून आले आहेत. जपानमध्ये जवळापास 10 लाख 55 हजार 578 कोरोना रूग्ण आढळून आले होते. तर दक्षिण कोरियामध्ये 4 लाख 60 हजार 766, फ्रान्समध्ये 3 लाख 84 हजार 184, ब्राझीलमध्ये 2 लाख 84 हजार 200, अमेरिकेत 2 लाख 72 हजार 075, जर्मनीत 2 लाख 23 हजार 227, हाँगकाँगमध्ये 1 लाख 08 हजार 577 तर तैवानमध्ये 1 लाध 07 हजार 381 कोरोना रूग्ण आढळून आले आहेत. चीनमध्ये तर लोकांना रूग्णालयात दाखल होण्यासाठी वेटिंग करावे लागत आहे. याचबरोबर मोठमोठ्या स्टेडियमचे रूपांतर रूग्णालयात करण्यात आले आहे.**

# भारत विरुद्ध बांग्लादेश दुसरी कसोटी

## भारताचा 'हा' खेळाडू 'सर डॉन ब्रॅडमनचा' मोडणार विक्रम

**कतार ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**





भारत आणि बांगलादेश यांच्यात गुरुवारपासून दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना खेळवला जाणार आहे. टीम इंडियाच्या दृष्टिकोनातून ही कसोटी खूप महत्त्वाची आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरण्यासाठी भारताला येथून उर्वरित पाच कसोटी सामने जिंकावे लागतील. भारताचे अनेक स्टार खेळाडू जसे की रोहित शर्मा, मोहम्मद शमी आणि जसप्रीत बुमराह या कसोटी मालिकेत खेळत नाहीत. मात्र, भारतीय फलंदाजांनी त्यांची उणीव सध्यातरी जाणवू दिली नाही.

चेतेश्वर पुजारा, श्रेयस अय्यर आणि विराट कोहली सध्या उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहेत. पुजाराने या मालिकेतही शतक झळकावले आहे. पहिल्या कसोटीत पुजाराने पहिल्या डावात ९० तर दुसऱ्या डावात नाबाद १०२ धावा केल्या होत्या. पुजाराचे हे शतक १४४३ दिवसांनी म्हणजेच तीन वर्षे ११ महिने आणि १३ दिवसांनी आले आहे. शेवटचे शतक पुजाराने जानेवारी २०१९ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध सिडनी येथे झळकावले होते. बांगलादेशविरुद्धचे शतक हे पुजाराच्या कसोटी कारकिर्दीतील १९वे शतक होते.पुजाराने १९वे शतक झळकावले. या प्रकरणात त्याने न्यूझीलंडच्या रॉस टेलर, वेस्ट इंडिजच्या गॉर्डन ग्रीनिज आणि क्लाइव्ह लॉयड आणि ऑस्ट्रेलियाच्या माइक हसीची बरोबरी केली. भारताने पहिली कसोटी १८८ धावांनी जिंकली. आता दुस-या कसोटीतही पुजाराची नजर आपला उत्कृष्ट फॉर्म कायम ठेवण्यावर असेल. तसेच, पुजाराला ऑस्ट्रेलियाचे माजी महान फलंदाज सर डॉन ब्रॅडमन यांना मागे टाकण्याची संधी आहे. पुजाराने आतापर्यंत ९७ कसोटीत ४४.७७ च्या सरासरीने ६९८४ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने १९ शतके आणि ३४ अर्धशतके केली आहेत. त्याचवेळी डॉन ब्रॅडमनने आपल्या कसोटी कारकिर्दीत ५२ कसोटी सामन्यांमध्ये ६९९६ धावा केल्या. यादरम्यान त्याची सरासरी ९९.९४ होती. म्हणजे पुजारा ब्रॅडमनपेक्षा फक्त १२ धावांनी मागे आहे. पुजारा जगभरातील फलंदाजांमध्ये कसोटीत सर्वाधिक धावा करणारा ५६वा आहे. ब्रॅडमनच नाही तर पुजारालाही इंग्लंडचा माजी कर्णधार अँड्र्यू स्ट्रॉसला मागे सोडण्याची संधी आहे.

# इतिहासातील सर्वात महागडे खेळाडू!

## कोणाची आहे मक्तेदारी भारतीय की परदेशी?

**। केरळ ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**



इंडियन प्रीमियर लीग सुरू झाल्यापासून या लीगची कीर्ती सतत वाढत आहे. लीगमधील संघ आपल्यासोबत चांगले खेळाडू घेण्यासाठी कोणतीही किंमत मोजण्यास तयार आहेत. जेव्हा लिलाव होतो तेव्हा अनेक वेळा अनेक संघ एकाच खेळाडूसाठी बोली लावू लागतात आणि अशा परिस्थितीत त्या खेळाडूची किंमत खूप वाढते. लीगच्या इतिहासात असे अनेक खेळाडू घडले आहेत ज्यांना प्रचंड पैसा मिळाला आहे. या लीगमधील पाच सर्वात महागडे खेळाडू आहेत. कोणाची आहे मक्तेदारी भारतीय की परदेशी पाहू...

2021 च्या हंगामासाठी राजस्थान रॉयल्सने ख्रिस मॉरिसवर मोठा सट्टा खेळला होता. राजस्थानने दक्षिण आफ्रिकेच्या अष्टपैलू खेळाडूला 16.25 कोटी रुपयांना विकत घेतले होते, ज्यामुळे तो लीग इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरला. मात्र मॉरिस त्याच्यावर लादलेल्या किमतीनुसार कामगिरी करू शकला नाही. पुढच्याच हंगामात त्याला राजस्थानने सोडले.

दिल्ली डेअरडेव्हिल्सने 2015 च्या हंगामासाठी भारतीय खेळाडू युवराज सिंगला 16 कोटी रुपयांना विकत घेतले. युवराज 2021 पर्यंत लीगमधील सर्वात महागडा खेळाडू राहिला होता. आता तो लीग इतिहासातील दुसरा सर्वात महागडा आणि महागडा भारतीय खेळाडू आहे.

2020 च्या मोसमासाठी कोलकाता नाईट रायडर्सने ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज पॅट कमिन्सला 15.5 कोटी रुपयांना विकत घेतले. त्या मोसमात कमिन्सची कामगिरी फारशी नाही, पण तरीही कोलकात्याने त्याला आपल्यासोबत ठेवले. कमिन्स 2021 च्या हंगामानंतर सोडण्यात आले आणि नंतर अर्ध्या किमतीत पुन्हा विकत घेतले.

2022 मध्ये झालेल्या मेगा लिलावात संघांनी भरपूर पैसे खर्च झाले. मुंबई इंडियन्स देखील त्यापैकी एक आहे. मुंबईने अतिशय हुशारीने आपले पैसे खर्च केले आणि इशान किशनला विकत घेण्यासाठी 15.25 कोटी रुपयांची बोली लावली. किशन हा या लीगमधील दुसरा सर्वात महागडा भारतीय खेळाडू आहे. इंग्लंडचा स्टार अष्टपैलू खेळाडू बेन स्टोक्सने 2017 मध्ये प्रथमच आयपीएल लिलावात भाग घेतला होता. रायझिंग पुणे सुपरजायंट्सने पहिल्या सत्रात 14.5 कोटी रुपयांची बोली लावून स्टोक्सला सर्वात महागडा खेळाडू बनवले. त्यावेळी स्टोक्स हा सर्वात महागडा परदेशी खेळाडू ठरला होता.